# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- ९८-२३** **दिनांक :- २५/०३/२०२३**

## फिर्यादीचे नावाचे बनावट कागदपत्रे तयार करुन विविध बॅकेतुन कर्ज घेवुन वाहने खरेदी करुन फसवणुक करणा-या आरोपीतांस अटक गुन्हे शाखा, कक्ष-3, विरार यांची कामगिरी.

दिनांक २१/१२/२०२२ रोजी पासुन ते दिनांक ११/०२/२०२३ रोजी पावेतो फिर्यादी नामे श्री. बाबसाहेब लिंबराज ओव्हाळ, वय ३९ वर्षे यांचे नावाचे अज्ञात आरोपीत यांनी बनावट पॅनकार्ड, अधारकार्ड बनवुन त्याव्दारे फिर्यादी यांचे नावे १) मुथुट फिनकार्प, २) एस. आय. क्रेवा कॅपीटल, ३) आय.डी. एफ.सी. फस्ट बॅक, ४) कोटक प्राईम फायनान्स, ५) एल. एन. टी. फायनान्स, ६) मास फायनान्स या विविध फायनान्स कंपन्यामधुन ०५,२१,५८३/- रुपये कर्ज काढुन फसवणुक केली तसेच कर्ज देणारे फायनान्स कंपनी यांनी फिर्यादी यांचे पॅनकार्ड व आधारकार्ड यांची खात्री न करता लोन देवुन फिर्यादी यांची फसवणुक केल्याबाबत विरार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नंबर १६२/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४२०,४६५,४६८,४७१,३४ अन्वये ११/०२/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील वसई-विरार परिसरात दाखल होणा-या फसवणुकीच्या गुन्हयांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना व मार्गदर्शन केले होते.

वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमणे वर नमुद दाखल गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष ३, विरार यांनी सुरु केला असता प्राथमीक तपासादरम्यान गुन्हयातील आरोपीत यांनी स्वतःची ओळख लपवीणे करीता खोटे नाव व पत्ते वापरल्याने त्यांचा शोध घेणे क्लिष्ट झाले होते. गुन्हे शाखा कक्ष ३, विरारचे अधिकारी व अंमलदार यांनी सतत पाठपुरावा करुन गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीचे आधारे आरोपीत नामे १) संजय बाळा परब, वय ४४ वर्षे, रा. विरार पश्चिम, ता. वसई, जि. पालघर. २) मोहम्मद मुस्ताक युसुफ बोहरा, वय ५० वर्षे, रा. विरार पुर्व, ता. वसई,जि. पालघर यांना ताब्यात घेवुन तपास केला असता आरोपीत यांनी त्यांचे इतर साथीदार यांचे सोबत आपसात संगणमत करुन वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. अटक अरोपीत यांचेकडे अधिक तपास करुन त्यांनी वेगवेगळया इसमांच्या नावे बनावट कागदपत्रांचा वापर करुन विविध फायनान्स कंपन्यामधुन कर्ज घेवुन एकुण ०६,३०,०००/- रुपये किंमतीच्या विविध कंपनीच्या ९ मोटारसायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत. सदर गुन्हयाचा पुढील तपास स.पो.नि. श्री. प्रविण भोसले, नेम. विरार पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. श्री. प्रमोद बडाख, पो.उप.नि. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अंम. राकेश पवार, सुमित जाधव, म.सु.ब. प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष ३, विरार तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम सायबर सेल यांनी केली आहे.




**-------000--------**